मे १४
२०२०

अंक - १ ला

# डिजिटल ई-मासिक




# ज्ञान - मंथन


संपादक - श्री. गणेश एन. सोळुंके

संपर्क - +91 8390132085
gnsolunke0092@gmail.com
http://www.cpskedarkheda1.blogspot.com

डिजिटल ई-मासिक

# ज्ञान-मंथन

## हे मासिक वाचून झाल्यानंतर आपली प्रतिक्रीया नक्की कळवा.

**आपली प्रतिक्रीया सकारात्मकच असावी असं काही नाही. मासिकाबद्दल आपले मत प्रामाणिकपणे मांडा. आपल्या सुचनांचे मनापासून स्वागत आहे. ज्यामुळे आम्हाला गुणवत्तापुर्ण व प्रभावी काम करता येईल.**

**मग द्याल ना आपला थोडासा वेळ... ?**

डिजिटल ई-मासिक

ज्ञान-मंथन




❖ संपादक ❖

**गणेश एन. सोळुंके,**

मुख्याध्यापक,

छत्रपती पब्लीक स्कुल, केदारखेडा,

ता.भोकरदन जि.जालना

मो.नं.8390132085

gnsolunke0092@gmail.com

डिजिटल ई-मासिक

# “ज्ञान-मंथन”

❖ संपादक ❖

**गणेश एन. सोळुंके,**

मुख्याध्यापक,

छत्रपती पब्लीक स्कुल, केदारखेडा,

ता.भोकरदन जि.जालना

मो.नं.8390132085

gnsolunke0092@gmail.com

❖ मुखपृष्ठ ❖

श्री.चेतन चव्हाण, वडोद तांगडा
ता.भोकरदन जि.जालना

मो.नं.9764462519

Chetanchavhan100@gmail.com

www.abhyudaysofttech.com

❖ अक्षर जुळणी ❖

गणेश एन. सोळुंके, भोकरदन जि.जालना

❖ मार्गदर्शक ❖

श्री.नासा येवतीकर, (प्रसिध्द स्तंभ लेखक)
धर्माबाद जि.नांदेड

श्री.चंद्रशेखर देशमुख (क्रिडा प्रशिक्षक) तथा
साधनव्यक्ती, भोकरदन जि.जालना

❖ विशेष सहकार्य ❖

**महाराष्ट्र अँडमिन पॅनल समुह**

तंत्रस्नेही शिक्षक समुह

छत्रपती पब्लीक स्कुल, केदारखेडा ता.भोकरदन

डिजिटल ई-मासिक

# ज्ञान-मंथन

## ❖ अनुक्रमणिका ❖


| अ.क्र. | घटकाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| 01 | प्रस्तावना | 04 |
| 02 | संपादकाचे मनोगत | 05 |
| 03 | छ.संभाजी महाराज जयंती विशेष | 06 |
| 04 | दृष्टीक्षेप : माणसात दिसला देव | 08 |
| 05 | काव्यविभाग | 09 |
| 06 | संस्काराची शिदोरी | 10 |
| 07 | भुमिका : शिक्षक-विद्यार्थी-पालक | 11 |
| 08 | दिवस आठवणीतले : गंमती-जमती | 12 |
| 09 | पर्यटन विशेष : भटकंती | 14 |
| 10 | हसत-खेळत शिक्षण : मायमराठी | 15 |
| 11 | हसत-खेळत शिक्षण : Eglish View | 16 |
| 12 | हसत-खेळत शिक्षण : गणित | 17 |
| 13 | ओळख तज्ञांची | 18 |
| 14 | ज्ञान-विज्ञान : मिळवा प्रयोगातून ज्ञान | 19 |
| 15 | ज्ञान-तंत्रज्ञान : Info-tech | 20 |
| 16 | स्पर्धा परिक्षा तंत्र | 21 |
| 17 | आजीच्या गोष्टी | 22 |
| 18 | Kids Corner : बोलके चित्र | 23 |
| 19 | Kids Corner : कोडे सोडवा | 25 |
| 20 | Keep Smiling : चला हसूया | 26 |
| 21 | माझी शाळा – माझे उपक्रम | 27 |
| 22 | या अंकातील उत्तरे | 28 |


**पुस्तके आणि चांगली माणसं लगेच कळत नाहीत, त्यासाठी त्यांना वाचावं लागतं.**

# ❖ प्रस्तावना ❖

ज्ञान म्हणजे माहिती. माणसाला ज्ञान विविध माध्यमातून मिळत राहते. कुटुंबातून, समाजातून, परिसरातून, अनुभवातून, शाळेतून, तसेच विविध प्रकारच्या साहित्यातून माणूस नेहमीच ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करत असतो. मनुष्य जन्माला येण्यापासून ते मरेपर्यंत नित्य नवनवीन गोष्टीचे ज्ञान प्राप्त करत असतो. एखादया गोष्टीत भरपूर ज्ञान प्राप्त केलेला व्यक्तीदेखील अपूर्ण असतो. दुसऱ्याकडुन त्याला काहीतरी नवीन गोष्ट शिकायला मिळते जे की त्याला माहित नसते. म्हणूनच संतांनी म्हटले आहे की,

जे जे आपणासी ठावे

ते ते इतरांशी सांगावे

शहाणे करून सोडावे, सकलजन

संपत्ती दिल्याने कमी होते मात्र ज्ञान दिल्याने वाढत राहते म्हणून नेहमी इतरांशी ज्ञानाची देवाणघेवाण चालू ठेवणे आवश्यक आहे. ही ज्ञानाची देवाणघेवाण विविध माध्यमाद्वारे केली जाते. त्यात मंथन करून सर्व ज्ञान एकत्र करणे म्हणजे दुधात साखर पडल्यासारखे होय. ज्याप्रकारे समुद्रमंथनातुन चौदा रत्न बाहेर पडली होती आणि शेवटी सर्वांनी अमृत प्राशन करून ही क्रिया थांबविली होती. अगदी तसेच या ज्ञान-मंथन मधून वाचकांना चौदा प्रकारच्या विषयांची माहिती देऊन अमृत प्राशन केल्यावर जो आनंद मिळतो तो आनंद देण्याचा प्रयत्न निश्चितपणे कौतुकास्पद आहे. तमाम वाचक वर्गांची पसंद लक्षात घेऊन, वाचकांची रुचीचा विचार करून संपादक गणेश सोळुंके यांनी ज्ञान-मंथन द्वारे ई-मासिकात टाकलेले पाऊल धैर्याचे व धाडसाचे आहे. त्यांच्या या पावलासोबत आपण सर्वजण पावले टाकत राहिलो तर मला विश्वास आहे की त्यांच्या या ज्ञान मंथनाला भविष्यात खुप चांगले स्थान मिळेल. या नव्या मासिकाचे वाचक नक्की स्वागत करतील अशी मला आशाच नाही तर खात्री आहे. पुनःश्च एकदा मनःपूर्वक अभिनंदन देतो.....!

- नासा येवतीकर, स्तंभलेखक

धर्माबाद जि.नांदेड 9423625769

डिजिटल ई-मासिक

ज्ञान-मंथन

## ❖ संपादकाचे मनोगत ❖

**"ज्ञान-मंथन"** हे ई-मासिक आपल्यापर्यंत पोहोचवितांना खुप आनंद होत आहे. बऱ्याच दिवसांपासून शिक्षक-विद्यार्थी-पालक-समाज या चारही घटकांचा विचार करुन यांना एकत्र कसे जोडता येईल याचा विचार करत होतो. शेवटी या मासिकाच्या रुपाणे या चारही बिंदुंना एकत्र जोडुन एक समभुज चौकोण साधण्याचा प्रयत्न केला आहे.

या मासिकाच्या माध्यामातून शैक्षणिक विचारांचे, ज्ञानाचे मंथन व्हावे हा हेतू समोर ठेवून जसे समुद्र-मंथनातून १४ रत्ने निघाली होती. त्याच प्रकारे या ज्ञान-मंथनातील ज्ञानरुपी समुद्रातून गुणवत्तापुर्ण रत्न प्राप्त करण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत. तसेच महाराष्ट्रभर विखुरलेले शिक्षणक्षेत्रातील रत्न एकत्र आणण्याचा प्रयत्न या मासिकाच्या माध्यमातून केला आहे.

हे मासिक प्रकशित करण्यासाठी प्रेरित करणारा **महाराष्ट्र ॲडमिन पॅनल समुह,** राज्यभरातील **तंत्रस्नेही समुह,** माझ्या गुरुस्थानी असलेले **श्री.चंद्रशेखर देशमुख सर,** माझे सहकारी मित्र **श्री.चेतन चव्हाण सर, छत्रपती पब्लीक स्कुल चे सहकारी शिक्षक** या सर्वांचे शतशः आभार. तसेच आपला अमुल्य वेळ देऊन या मासिकासाठी प्रस्तावना लिहील्या बद्दल व वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल **प्रसिध्द स्तंभलेखक श्री.ना.सा.येवतीकर सर** यांचे ऋण व्यक्त करतो.

त्याचबरोबर या मासिकाच्या निर्मितीसाठी, प्रकाशनासाठी, प्रसिध्दीसाठी ज्यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या सहकार्य केले, प्रोत्साहन दिले त्या सर्वांचे मी मनःपुर्वक आभार व्यक्त करतो.

**हे ई-मासिक आपणांस कसे वाटले नक्की कळवा. आपल्या सकारात्मक-नकारात्मक प्रतिक्रिया पुढील कार्यास नक्कीच चालना देतील.**

**धन्यवाद...!**


**गणेश एन.सोळुंके**

**संपादक,**

**मो.नं. 8390132085**


डिजिटल ई-मासिक
ज्ञान-मंथन

१४ मे विशेष

# "छत्रपती संभाजी महाराज" जयंती निमीत्त

१४ मे विशेष



**मराठ्यांचा पहिला युवराज** होण्याचा मान जर कोणास मिळाला असेल तर तो म्हणजे शिवपुत्र संभाजी यांना. छत्रपती संभाजी राजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. शंभूराजे अवघे २ वर्षे ३ महिन्यांचे असतांना त्यांच्या आई महाराणी सईबाईचा मृत्यू झाला. युवराज संभाजीना शस्त्रविद्या, शास्त्रविद्या, घोडेस्वारी, राज्यकारभार या सोबतच विविध भाषा शिकवल्या गेल्या. त्या काळातील ज्ञानभाषा संस्कृत यावी यासाठी जिजाऊ व शिवरायांनी विशेष लक्ष दिले. त्यामुळे छत्रपती संभाजी राजांनी वयाच्या १४ व्या वर्षी संस्कृत भाषेमध्ये "बुधभूषण" नावाचा ग्रंथ लिहिला. 'बुध' म्हणजे विद्वान व 'भूषण' म्हणजे दागिना. या ग्रंथातील एका ओळीचा अर्थ असा आहे की,

**"जे प्रयत्नवादी असतात तेच मर्द असतात,**

**जे दैववादी असतात ते नामर्द असतात."**

वयाच्या १४व्या वर्षी प्रयत्नवादाची अशा प्रकारे नजर यावी यातच छत्रपती संभाजी राजांची प्रचंड बुध्दिमत्ता दिसून येते. या व्यतिरिक्त 'नायिका भेद', 'नखशिख', 'सातशतक' हे तीन ग्रंथ ब्रजभाषेमध्ये आहेत. ब्रजभाषा ही हिंदी ची उपभाषा आहे. चारपैकी तीन ग्रंथ हिंदीत लिहून जणू काही संभाजी महाराजांनी हेच दाखवून दिले की, हिंदी हीच आपली राष्ट्रभाषा आहे. वयाच्या नवव्या वर्षी दिल्लीत जाणे व संपुर्ण उत्तर भारत ते दख्खन हा प्रवास करणे यात त्यांच्या असे लक्षात आले की बहुतेक ठिकाणी हिंदी भाषा बोलली जाते.

## राजमुद्रा :

छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा अष्टकोनी असून छत्रपती संभाजी महाराजांची राजमुद्रा षोडश मुद्रा म्हणजे सोळा कोनांची आहे.



**श्री शंभोः शिवजातस्य, मुद्रा द्योरिव राजते ।**

**यंदंकसेविनो लेखा, वर्तते कस्य नोपरि ।।**

याचा अर्थ असा आहे की, छत्रपती शिवाजी राजे यांचे पुत्र श्री संभाजी यांची मुद्रा आकाशाप्रमाणे शोभत आहे. तिचे अंकसेवन करणाऱ्यांचा (आधार घेणाऱ्यांचा) पगडा (प्रथम) कोणावर पडणार नाही ? (सगळ्यांवर पडेल) आणि आजही तरुणांचे प्रेरणास्थान छत्रपती संभाजी महाराज आहेत.

## स्वतंत्र राज्यकारभार :

छत्रपती शिवाजी महाराजांनी छत्रपती संभाजी महाराजंना २६ जानेवारी १६७१ रोजी स्वतंत्र राज्यकारभार करण्याचे अधिकार दिले होते. म्हणजे शिवराय व संभाजी राजे एकाच वेळी स्वतंत्र राज्यकारभार पाहत होते. म्हणजे शिवराय केंद्रशासन तर संभाजी महाराज राज्यशासन. अगदी याच पध्दतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संघराज्या अंतर्गत अनेक गणराज्य चालविले जावे यासाठी आवर्जुन २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अंमलात आणून भारत हे प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून उदयास आणले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटना पूर्ण झालेली असतांना डॉ.बाबासाहेबांनी संभाजी राजांना २६ जानेवारी १६७१ ची स्वतंत्र राज्यकारभार दिल्याची आठवण म्हणून २६ जानेवारी ही तारीख निवडली. छत्रपती संभाजी महाराज यांनी सुध्दा शिवरायांचेच अनुकरण केले. महाराणी येसूबाईला **"स्त्री सखी राज्ञी जयती"** असा सही शिक्क्याचा अधिकार देऊन स्वतंत्र राज्यकारभार करण्याचा अधिकार दिला. छत्रपती संभाजी महाराज हे मराठ्यांचे पहिले राजे आहेत की, त्यांनी आपल्या पत्नीस सही शिक्क्याचा अधिकार दिला.

इ.स.१६७२ ला भारतात आलेला फ्रेंच प्रवासी एबे कॅरे म्हणतो, “शंभूराजे सुंदर आहेत. संभाजीच्या हाताखाली काम करण्यास सैनिकांना विशेष धन्यता वाटते. शंभूराजे सैनिकांनी कामगिरी केली तर कौतूक करतात. शौर्य दाखवले तर बक्षीस देतात. ज्यांच्यावर शंभूराजे स्वारी करणार ते त्यांच्या नावाच्याच दराऱ्याने पळून गेले”. प्रसिध्द इतिहासकार काफीखान यांच्या मते “संभाजी हे शिवाजी महाराजांपेक्षा दहापटींनी अधिक तापदायक राजे होते”.

छत्रपती संभाजी महाराज मुघल, सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज, स्वराज्यातील अंतर्गत वाद यांच्याशी एकाच वेळी संघर्ष करत होते. चोवीस तासात चालत्या घोड्यावर कोठेतरी चार तास आराम करुन शत्रूला सळो की पळो करुन सोडीत होते. नऊ वर्षे सतत शत्रूशी मुकाबला करीत असतांना जनतेकडे कधी दुर्लक्ष होऊ दिले नाही. १६ जानेवारी १६८१ ला रायगडावर राज्याभिषेक झाला. १६८२ मध्ये डिचोळी आणि कुडाळ येथे तोफखाण्याचे, दारुगोळ्याचे कारखाने काढले. शत्रूच्या जाळपोळीत प्रजेचे जे नुकसान होत होते ते भरपाई करुन देण्याची स्वतंत्र पध्दत संभाजी महाराजांनी सुरु केली. छत्रपती संभाजी महाराजांच्या समकालीन साहित्य “परमानंद काव्यम” मध्ये तर छत्रपती संभाजी महाराजांना लोक “महात्मा” म्हणत अशी नोंद सापडते. छत्रपती संभाजी महाराज असे एकमेव राजे आहेत ज्यांना लोक महात्मा म्हणत.

## जंजिरा :

संभाजी राजांनी कोंडाजी फर्जंद यास नोकरीच्या निमित्ताने जंजिऱ्यास जाण्यास सांगितले. कोंडाजी फर्जंद त्यात यशस्वीही झाले व ते सहकुटुंब जंजिऱ्याला राहू लागले. नियोजन असे होते की, संधी मिळताच जंजिऱ्यावरील दारुखाना, अन्न कोठार इत्यादींना आग लावून द्यायची व त्याच वेळी बाहेरून संभाजी राजांनी हल्ला करायचा. परंतू या गुप्त कटाचा सुगावा सिद्दीला लागला. कोंडाजीला अटक करुन मारण्यात आले. ही योजना अयशस्वी होताच छत्रपती संभाजी महाराजांनी शहजादा अकबरासह २० हजार सैन्यांनिशी जंजिऱ्यावर हल्ला केला. सतत १५ दिवस तरंगत्या तोफखान्यातून तोफांचा अविरत मारा केला. किल्ल्याभोवतीच्या ८०० यार्ड X ३० यार्ड (२४०० फूट लांब X २० फूट खोल) खंदकात दगड, लाकूड, कापसाची कानेदी, वृक्ष इ. टाकून भराव घातला. या कामासाठी पन्नास हजार माणसे कामाला लावली होती. फेब्रुवारी १६८२ च्या दरम्यान रस्ता तयार झाला होता. पण तेव्हाच औरंगजेबाने नवाब अलीखान यास कोकणाकडे पाठवले. नवाबाने कल्याण घेतल्याची बातमी संभाजी राजांना कळाली. स्वतःच्या स्वराज्याचा प्रदेश रक्षण करणे हे पहिले कर्तव्य या इराद्याने हातातोंडाशी आलेला जंजिरा राजांनी सोडला.

शेवटी फंदफितुरीमुळे छत्रपती संभाजी महाराजांना मुकर्रबखानाने संगमेश्वरला अटक केली. औरंगजेबने दोन प्रश्न विचारले १) तुझी स्वराज्याची संपत्ती कोठे आहे ? २) तुला माझे कोण-कोण सरदार मिळालेले आहेत ? यापैकी एकाचेही उत्तर राजांनी दिले नाही. तुळापूर येथे ११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांचा मृत्यू झाला.

जय रौद्र शंभो...। छत्रपती संभाजी महाराजांची राजमुद्रा




**छत्रपती संभाजी महाराजांची राजमुद्रा**



**शिवश्री लक्ष्मीकांत साहेबराव कोलते,**

प्रसिध्द व्याख्याते तथा लेखक,

मध्यप्रदेश राज्यप्रभारी, मराठा सेवा संघ.

मो.नं.7031191919

# दृष्टिक्षेप :

# कोरोनाचे सावट

**दृष्टक्षेप या सदरामध्ये आपण चालु घडामोडींवर आधारित लेख प्रकाशित करणार आहोत. सध्या सर्वत्र कोरोना विषाणूने थैमान घातलेले असल्यामुळे यावेळच्या मासिकात आपण कोरोना वर दृष्टीक्षेप टाकणार आहोत.**

## माणसात दिसला देव :




सध्या विश्वभरात 'कोरोना' या विषाणू ने थैमान घातलेले असतांना सर्वच धार्मिक स्थळे बंद आहेत. अश्या संकटाच्या वेळी देव सुद्धा सुट्टीवर गेला असे उपरोधिक उद्गार सुद्धा ऐकायला मिळत आहे. पण, खऱ्या अर्थाने देव हा कधीच सुट्टीवर जात नसतो. तो नेहमी आपल्या अवतीभवती असतोच. फक्त त्याचे अस्तित्व समजून घेता आले पाहिजे. म्हणूनच तर संत गाडगे महाराज नेहमी सांगत असत की, देव देवळात नसून तो माणसात आहे. माणसातला देव ओळखायला शिका. तो आपल्यामध्ये राहून आपली वेळोवेळी मदत करत असतो.

म्हणूनच तर आज 'कोरोना' मुळे सगळे जग बंद पडलेले असतांना आपला जीव धोक्यात घालून या संकटावर मात करण्यासाठी अहोरात्र काम करत आहेत. मग त्यात वैद्यकीय क्षेत्रात काम करणारे डॉक्टर, नर्स, मेडिकल स्टोअर वाले, पोलीस बांधव, पेट्रोल पंपावर सेवा देणारे कर्मचारी, तसेच इतर कर्मचारी हे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पणे आपले कर्तव्य बजावतांना दिसतात.

आजच्या परिस्थितीमध्ये हि माणसं देवापेक्षा कमी नाहीत. जणू देवच यांच्या रूपाने मानवजातीचे संरक्षण करण्याचे कार्य पार पडत आहेत.

विविध क्षेत्रातील प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, राजकीय पुढारी, सेलिब्रिटीज हे आप-आपल्या परीने होईल ते कार्य करत आहेतच त्याचबरोबर बऱ्याच सामाजिक संस्था सुद्धा देवाच्या रुपानेच गोर-गरिबांसाठी अन्न पुरविण्याचे काम करतांना दिसत आहेत. ज्या लोकांना एक वेळचं जेवण मिळू शकत नाही अशा लोकांच्या भाकरीची व्यवस्था केल्यानंतर साहजिकच त्या गरीब व गरजू लोकांसाठी ते आज घडीला देवच आहेत. मी अजून तरी देव प्रत्यक्ष बघितलेला नाही आणि आपल्यापैकी देवाला कुणीही बघितलेले असेल असे वाटत नाही. पण, हि जी माणसं आपला जीव धोक्यात टाकून होईल त्या पद्धतीने मानवजातीची सेवा करत आहेत ते आपल्यासाठी आजघडीला तरी देवच आहेत.


या सर्व देवमाणसांना माझ्या अंतःकरणातुन साष्टांग दंडवत.

गणेश एन.सोळुंके

## काव्य विभाग :


## कविता : कोरोनाचे आव्हाण

सध्या किती घातलं थैमान,
कोरोना व्हायरसनं केलं हैराण,
जिकडे तिकडे बंद दिसे
मंदिरेही बंद ओसाड भासे
बाहेर कोणी खेळायला दिसेना,
घरात काही मला बसवेना





लढाया कोरोनाशी गर्दी टाळू
स्वच्छता पाळू कोरोनाला पळवू



खिशात हात तोंडावर पट्टी
तुझ्याशी लढायला शाळेला सुट्टी
ढकलल्या सर्व परीक्षा पुढे
आव्हाण मोटे आरोग्ययंत्रणे पुढे
पळवून लावू तुला माघारी
सुखी होईल जनता सारी...

❖ सुरेखा म्हस्के, लासुर स्टेशन ❖

---

## कविता : वर्ग माझा स्वर्ग होता

वर्ग माझा स्वर्ग होता
एकेक इयत्ता पार करत
बालप्रवास कसा सुरेख होता
काठावर का पास होईना
वर्ग माझा स्वर्ग होता...।

गणिताशी असे कट्टी नेहमी
इंग्रजीशी अघोषीत सत्याग्रह होता
मराठीची ती अवीट गोडी
इतिहासात सनावळांचा भुलभुलैय्या होता
हिंदीची होई चिंधी
भुगोलात माझा भारत होता




तासांचा येई कंटाळा पण वर्ग माझा स्वर्ग होता...।

नव्हती चिंता व्याप काही
दिवस कसा उनाड होता
ऊन पाऊस हसत खेळत
वर्ग माझा स्वर्ग होता
आठवे आज सारं काही
बाक शाळेचा दिसला होता
त्याच बाकावर उडत नाचत
वर्ग माझा स्वर्ग होता...।

**सौ.संपदा दिनेश नळणीकर**

**व्यवस्थापिका, युवापरिवर्तन केंद्र, भोकरदन**

याच प्रकारे चालु घडामोडीवर ८३९०१३२०८५ या क्रमांकावर व्हाट्सअप च्या माध्यमातून आपले लेख, कविता, व्यंगचित्र, वात्रटिका इ. साहेत्य आपण पाठवू शकता. सोबत आपले पुर्ण नाव, पत्ता व एक फोटो पाठवायला विसरु नका. आपण पाठविलेली माहिती आपल्या नावासह प्रकाशीत करण्याचा आम्ही नक्कीच प्रयत्न करु.

## संस्काराची शिदोरी

# ❖ "मुलांवर योग्य संस्कार कसे कराल ?" ❖



❍ रात्री जेवताना मुलांसोबत गप्पा मारण्याची सवय लावा.

❍ घरात मुलांसमोर आदळ-आपट करु नका, भांडणे करू नका.

❍ मुलांना रोज एक चांगले काम करण्याची सवय लावा. त्याबद्दल मुलांशी चर्चा करा.

❍ मुलांनी जर चांगले काम केले असेल तर त्याचे तोंड भरून कौतुक करा.

❍ मुलांनी चूक केल्यास त्यांचा अपमान करु नका त्यांना शांततेत समजाऊन सांगा.

❍ पालकांनी मुलांसमोर आपल्या आई-वडीलांसोबत प्रेमाने व आपुलकीने वागावे.

❍ थोरा-मोठ्यांचा मान-सन्मान करण्यास, त्यांच्याशी अदबीने बोलण्यास शिकवावे.

❍ मुलांसमोर कुठलेही व्यसन करू नका.

❍ मुलांना अभ्यासाबरोबरच त्यांचे छंद जोपासण्याची संधी द्या.

❍ मुलांच्या प्रश्नांची समर्पक व वैज्ञानिक दृष्टीने उत्तरे द्या. त्यांची प्रश्ने टाळू नका.

❍ श्रध्दा व अंधश्रध्दा यांतील फरक मुलांना समजावून सांगा.

❍ मुलांना मोबाईल, टी.व्ही., लॅपटॉप ची अती सवय लावू नका.

❍ मुलांना मैदानी खेळ खेळण्याची सवय लावा. त्यामुळे पराभव सहन करण्याची सुध्दा सवय लागते व खेळाडुवृत्ती निर्माण होते.

❍ मुलाची प्रत्येक मागणी सर्रासपणे पूर्ण करू नये. त्यांना नकाराची सुध्दा सवय लावावी.

❍ कामावर जाताना बॉस म्हणून गेले तरी चालेल. पण, घरी येतांना पालक म्हणूनच या.

❍ मुलांशी कधीही नाकारात्मक-दृष्ट्या बोलू नये. नालायक, गाढव, मूर्ख यासारखे अपमानकारक शब्द वापरू नये. त्यामुळे त्यांच्यात न्युनगंड निर्माण होऊ शकतो.

❍ तू असं केलंस तर मी सोडून एकटे जाईन असे मुलांशी कधीही बोलू नये.

❍ मुलांचे मित्र, मैत्रीणी कोण आहेत ? त्यांच्याशी सुध्दा आपला संवाद असु द्यावा.

❍ मुलांच्या आहाराकडे विशेष लक्ष पुरवा, आवश्यकते नुसार आहार तज्ञांचा सल्ला घ्या.

❍ आपल्या लहान मुलांसाठी आपणच चांगले गुरू, चांगले मार्गदर्शक व्हा. **(संकलन)**

शिक्षक-विद्यार्थी-पालक

# भुमिका




आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे असे आपण म्हणतो. आणि सध्याची परिस्थिती पाहता ते योग्य सुध्दा आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येक जण धावतो आहे. आपला मुलगा इतर मुलांच्या तुलनेत अधिक हुशार कसा होईल यासाठी पालकांमध्ये वाट्टेल तो खर्च करण्याची स्पर्धा लागली आहे. आपल्या शाळेचा किंवा क्लासेसचा विद्यार्थी कसा गुणवत्ता यादीत झळकेल यासाठी संबंधीत शिक्षक व संस्थाचालकांमध्ये स्पर्धा लागलेली आहे. तर दुसरीकडे जास्तीचे गुण मिळविण्यासाठी विद्यार्थी अहोरात्र परिश्रम घेत आहे. वाढत्या बेरोजगारीमुळे तरुणवर्ग रोजगार मिळण्यासाठी धावत आहे.

एकंदरीत काय तर, विद्यार्थी किंवा युवावर्ग हा त्यांच्या अस्तित्वासाठी धावत आहेच पण त्याहीपेक्षा या विद्यार्थ्यांचे पालक व त्यांचे शिक्षक जास्तीचे धावतांना दिसत आहेत. विद्यार्थी-पालक-शिक्षक हे तिन्ही घटक आपल्या परिने परिश्रम घेत आहेत. पण मानसीक व आर्थिक दृष्टीने विचार केल्यास याचा सकारात्मक परिणाम होण्याऐवजी नकारात्मक परिणाम जास्त होतांना दिसत आहेत.

ग्रामीण भागाचा किंवा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कुटुंबाचा विचार केला तर मुलगा जेव्हा दहावीला जातो तेव्हाच खऱ्या अर्थाने पालक आपल्या मुलाच्या अभ्यासाकडे जास्त लक्ष द्यायला सुरुवात करतात. त्यापुर्वी तो काय शिकला ? कसा शिकला ?  याकडे फारसे पालकांचे लक्षच नसते. याउलट परिस्थिती शहरी भागाची किंवा सुशिक्षीत म्हणविणाऱ्या कुटुंबाची असते. मुलगा नर्सरीत गेल्यापासुनच त्याच्याकडे इतके निर्बंध लादले जातात की त्या बालकाचे निरागस वय त्या अभ्यासाच्या ओझ्याखाली दबुन जाते. या दोन्ही गोष्टी मुलांच्या मानसीकतेच्या दृष्टीने हानिकारकच आहे. थोडक्यात सांगायचे तर अतिशय निष्काळजीपणा व अतिकाळजी या दोन्ही गोष्टी मुलांसाठी हानिकारक व त्रासदायकच ठरु शकतात. आणि याचाच समन्वय साधण्याचा प्रयत्न मी या सदरातून मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

मुलांची प्रगती झाली तर पालकांचा सन्मान वाढतो. विद्यार्थी गुणवंत निघाला तर शाळेची किंवा क्लासेसची प्रतिमा उंचावते. तण हे होत असतांना त्या विद्यार्थ्याची काय फरफट होते याचा कधी विचारच आपण करत नाही. मुलांची प्रगती साधण्यासाठी विद्यार्थी-शिक्षक-पालक या तिन्ही घटकांमध्ये योग्य तो समन्वय असणे गरजेचे आहे. यावरच प्रकाश टाकण्यासाठी एक सकारात्मक ऊर्जा देण्याचा प्रयत्न या मासिकाच्या माध्यमातुन पुढील अंकात करणार आहे.

गणेश एन.सोळुंके

टिप : **शिक्षक-विद्यार्थी-पालक** यांच्या भुमिकेबद्दल ८३९०१३२०८५ या क्रमांकावर व्हाट्सअप च्या माध्यमातून आपले लेख आपण पाठवू शकता.

# माझे पहिले भाषण

मी इयत्ता पाचवी मध्ये शिकत असतांनाचा हा प्रसंग. तो प्रसंग आठवला की अजून सुद्धा हसू येतं. शाळेतले दिवस आठवले की कितीही दुःख असले तरी दूर झाल्यासारखे वाटते. ते दिवस असतातच निरागस, निडर, आणि मंतरलेले.




आमच्या शाळेमध्ये लोकमान्य टिळकांच्या जयंती निमीत्त भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मी तेव्हा इयत्ता पाचवी मध्ये होतो. मी मोठ्या उत्सुकतेने स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला होता. पहिल्यांदाच भाषण स्पर्धेत भाग घेतल्यामुळे खूप उत्साहात होतो. घरी गेल्या बरोबर आईकडून भाषण लिहून घेतले. स्पर्धेला साधारण आठ-दहा दिवस बाकी असतील. भाषणाची जय्यत तयारी मी करत होतो (तयारी म्हणजे काय फक्त पाठांतर करत होतो) पहिल्यांदाच व्यासपिठावर बोलणार म्हटल्यावर मी खुपच आनंदात होतो. येता-जाता सतत मुखात भाषणच होते. सराव अगदी जोरात सूरु होता. घरी कुणीही पाहुणा आला तरी माझं त्यांच्यासमोर कॅसेट लावल्यासारखं तेच भाषण सुरु व्हायचे.

ज्या दिवसाची मला उत्सुकता होती तो दिवस अखेर उजाडला. आम्ही चार-पाच मित्र मोठ्या उत्साहाने शाळेकडे पाई-पाई निघालो. शाळेकडे जातांना रस्त्यातच माझ्या वर्गातील मित्र कैलासचे घर होते. त्याला नेहमीप्रमाणे शाळेत येण्यासाठी आवाज दिला तेव्हा त्याच्या वडिलांनी आम्हाला घरात बोलावले. कैलासने सुध्दा भाषणामध्ये भाग घेतला होता. त्याच्या वडीलांनी त्याच्याकडुन चांगली तयारी करुन घेतली होती. त्यामुळे त्याच्यापेक्षाही त्याच्या वडीलांना जास्त उत्सुकता होती त्याच्या भाषणाची. त्यांना तर खूप वाटत होते की, आपण सुद्धा शाळेत यावे कैलासचे भाषण ऐकायला पण त्यांना ड्युटीवर जायचे असल्यामुळे ते त्या कार्यक्रमाला येऊ शकणार नव्हते. त्यामुळे त्यांनी त्यांच्या घरीच आमची तयारी कशी झाली आहे हे बघण्याचे ठरविले. आम्ही त्यांच्या समोर भाषणे करुन दाखविली. कैलासने आमच्या सर्वांपेक्षा छान भाषण करुन दाखविले. त्याचे वडील खुपच खुष झाले व त्यांनी आम्हाला सगळ्यांना संत्रागोळ्या घेण्यासाठी पाच रुपये दिले. आम्ही अति उत्साहाने शाळेकडे पळतच सुटलो. शाळेच्या गेटसमोर पोहोचताच गेटच्या बाजूला असलेल्या हातगाडीवरून अगोदर संत्रा गोळ्या घेतल्या. गोळ्या वाटपात कोणताही भ्रष्टाचार होणार नाही याची कैलासने पूर्ण काळजी घेत व्यवस्थित वाटे केले आणि उड्या मारत-मारत आम्ही शाळेच्या दिशेने निघालो.

आम्ही आमच्या वर्गात बसलेलो होतो सरांनी हजेरी घेतली आणि आम्हाला ग्राऊंडवर एका लाइनमध्ये जाण्यास सांगितले. एका लाईन मध्ये जातील ती मुलं कसली ? त्यामुळेच तर आमचे सर आम्हाला नेहमी म्हणत... अरे तुम्ही देवाघरची फुलं नसून देवाघरची ढोरं आहात ढोरं. त्यांचे हे बोलणे आम्ही कधीच खोटे ठरू दिले नाही हे सुद्धा विशेष.

अखेर कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रतिमापूजन, स्वागत-सत्कार चालू होते. तिकडे माझं लक्ष नव्हतंच. खालचे वाळूचे बारीक-बारीक खडे उचलून समोर बसलेल्या मुलाच्या दप्तरामध्ये टाकण्यातच मला जास्त आनंद वाटत होता. तितक्यात अंभोरे सरांनी माझ्या डोक्यात टपली मारत मला व्यवस्थित बसण्यास सांगितले. तसा मी हाताला घडी आणि तोंडावर बोट ठेऊन बसलो. सर गेल्यानंतर माझे उद्योग परत चालू झाले.

आता विद्यार्थ्यांच्या भाषणास सुरुवात झाली होती. एक-एक स्पर्धक भाषण करत होता. बऱ्याच जणांचे भाषण तर 'मी शेंगा खाल्ल्या नाही, मी टरफले उचलणार नाही' या पलीकडे जातच नव्हते. एखादा मुलगा अतिशय जोरदार भाषण करत होता तर एखादा भाषण करतांना काही आठवले नाही तर खिशातली

चिठ्ठी काढुन वाचायला सुरुवात करत होता. तर कुणी पहिल्या वाक्यातच आपले भाषण संपवित होता. आम्ही खाली बसुन मात्र त्यांना मोठ्याने हसत होतो. त्यात कैलास आणि मी तर आघाडीवरच होतो.

बऱ्याच वेळाने भाषणासाठी कैलासचे नाव पुकारण्यात आले. आम्ही सर्व मित्रांनी त्याला टाळ्यांनी भर-भरभरुन दाद दिली. कैलासने जेव्हा भाषणाला सुरुवात केली. तेव्हा त्याला सुरुवातीला काहीच सुचेना. इकडुन-तिकडुन त्याने भाषणाला सुरुवाती केली तर मुलींकडे हात करुन त्यांना मित्रांनो तर मुलांकडे हात करत मैत्रीणिंनो म्हटल्याबरोबर एकच हशा उडाली. घाबरल्यामुळे असे झाले असावे. कैलास ने एक-दोन वाक्यातच आपले भाषण आवरते घेतले. मनात विचार आला की, हाच का तो कैलास ज्याने आत्ताच त्याच्या घरी इतके छान भाषण केले होते. आणि त्याने केलेल्या छान भाषणामुळे आपल्याला संत्रा गोळ्या खायला भेटल्या. आता काय झालं असेल नेमकं याला ? याच्या भाषणाचा कचरा झालाच आहे. त्याला अपमान वाटला तर तो आपल्याकडच्या उरलेल्या गोळ्या सुद्धा परत घेईल म्हणून मी उरलेल्या दोन गोळ्या एकदमच तोंडात टाकून घेतल्या. आता घे म्हणावं तुझ्या गोळ्या परत असा मनातल्या मनात विचार करत गालातल्या गालात हसायला लागलो. तेव्हड्यात भाषणासाठी माझे नाव पुकारण्यात आले. माझे नाव कानावर पडताच तोंडातल्या गोळ्या चखळत न बसता दाताने चावून-चावून बारीक केल्या आणि व्यासपिठाकडे जाईपर्यंत खाऊन घेतल्या आणि चिकट झालेले तोंड शर्टाच्या बाह्यांना पुसत व्यासपीठावर प्रकट झालो.

सरांनी माईक समोर उभे राहण्यासाठी इशारा केला. मोठ्या थाटात माईकला हात लावताच कुर्र्रर्रर्र असा आवाज यायला लागला. त्याचवेळी सगळे हसायला लागले. बाजूला बसलेले शिक्षक समोर आले आणि त्यांनी माईकला हात न लावण्याचे सुचवले. मी कशी-बशी भाषणाला सुरुवात केली. माईकवर पहिल्यांदाच बोलत असल्यामुळे माझाच आवाज मला परत ऐकू येत असल्याचा भास होत होता. कधी-कधी वाटत होते की आपला आवाज समोर जातोय की नाही. भाषणापेक्षा माझे लक्ष त्या माईककडेच जास्त होते. माझं भाषण बिनचुक चालु होतं परंतु आवाज समोर जात नव्हता. त्यामुळे माझ्या उजव्या बाजुला थोड्या अंतरावर बसलेले आमचे वर्गशिक्षक सरकटेसर मला माईक कधी लांब तर कधी जवळ धरण्याचा लांबूनच इशारा करत होते. माईकला हात लावला तर परत कुर्र्रर्रर्र आवाज होईल म्हणून मी त्याला हात न लावता स्वतःच माझे तोंड मागे पुढे करत होतो. आता मी मात्र पुरता गोंधळून गेलो होतो. या सगळ्यांमुळे माझी मात्र उरली-सुरली हवा निघुन गेली होती. माईकचं अंतर मेन्टेन ठेवण्यासाठी कमरेतून पुढच्या बाजूला थोडं वाकुन भाषण करत होतो. ते बघुन खाली बसलेले सर्वच मुलं हसायला लागली होती. मी तर भाषण न चुकता करत होतो. पण मला कळत नव्हते की, ही मुलं नेमकी का हसत आहे म्हणुन. जेव्हा भाषण संपवून खाली बसलो तेव्हा कैलासने माझी नक्कल करुन दाखवली त्यानंतर मला हसावे कि रडावे हेच कळत नव्हते.

भाषण स्पर्धा संपून वर्ष होत आले तरी मला चिडविण्यासाठी माझे मित्र आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष कुर्र्रर्रर्र.... पुज्ज गुरुजन कुर्र्रर्रर्र आणि येथे जमलेल्या माझ्या कुरुर्रर्रर्र .... असं म्हणून चिडवत असत.

असो... पण तो माझा व्यासपिठावरचा पहिला अनुभव असल्याने मी कधिही विसरु शकणार नाही. आता ही आम्ही जुने मित्र भेटलो की तो भाषणाचा किस्सा आठवल्या शिवाय राहत नाही.

ते भाषण परत एकदा करण्याची संधी आता मिळाली तर किती बरे होईल.....!



**गणेश सोळुंके**

---


तुम्हाला सुध्दा तुमच्या शाळेतल्या आठवणी व्यक्त करायच्या असतील तर ८३९०१३२०८५ या क्रमांकावर व्हाट्सअप च्या माध्यमातून आपले लेख किंवा कविता आपण पाठवू शकता. सोबत आपले पुर्ण नाव, पत्ता व एक फोटो पाठवायला विसरु नका. आपण पाठविलेली माहिती आपल्या नावासह प्रकाशीत करण्याचा आम्ही नक्कीच प्रयत्न करु.

**पर्यटन विशेष :**

# भटकंती...

भारतातीलच नव्हे तर जगातील प्रत्येक कोप-यामध्ये धार्मिक, ऐतेहासिक, उत्कंठावर्धक, धोकादायक, नैसर्गिक सौंदर्याने नटलेली बरीच ठिकाणे आहेत. या ठिकाणांना बघण्यासाठी आपण नेहमीच आतूर असतो. चला तर मग भटकंती या सदरातून देशातील वेगवेगळ्या राज्यांच्या पर्यटन स्थळांच्या बाबतीत. आपण माहिति करुन घेऊया.

## ऐतेहासिक भारत : शिवरायांचे किल्ले :



या सदराची सुरुवात करुयात महाराष्ट्राचे अराध्य दैवत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गड-किल्ल्यांपासुन. आज आपण या किल्ल्यांचा थोडक्यात आढावा घेणार आहोत. पुढील अंकापासुन आपण सविस्तर माहिती बघणार आहोत.

राजगड, रायगड, शिवनेरी, तोरणा, सिंहगड, प्रतापगड, पुरंदर, लोहगड, पन्हाळा, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, जंजिरा, विशाळगड, मंगरुळगड इ. महत्त्वाचे किल्ले श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात होते. श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म "शिवनेरी" गडावर झाला. त्यांनी प्रथम जिंकलेला किल्ला "तोरणा होय". "राजगड" ही मराठी राज्याची पहिली राजधानी होती. नंतर "रायगड" झाली. राजगड हा किल्ला श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतः बांधून घेतला. त्यापूर्वी त्या शहामृग नावाच्या डोंगरावर मुरुंबदेवाचे (ब्रह्मदेवाचे) देऊळ होते. ते देऊळ अजूनही राजगडाच्या बालेकिल्ल्यावर आहे. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग हे अरबी समुद्राला लागून असलेले किल्ले/जलदुर्ग आहेत. ते समुद्रमार्गे होणाऱ्या शत्रूंच्या हल्ल्यापासून स्वराज्याचे रक्षण करत. महाराष्ट्रातील हे सर्व किल्ले महाराष्ट्राची शान आहेत. पुढील अंकात महाराष्ट्रातील किल्ल्यांची सविस्तर माहिती बघणार आहोत.

## सांस्कृतिक भारत : गणपतीपुळे



रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे म्हटलं की आपल्या नजरेसमोर येते ते गणपतीचे मंदिर, समुद्र किनारा. पण आपण आज यापेक्षा थोड्या वेगळ्या ठिकाणी सैर करणार आहोत. गणपतीपुळ्या पासून एक किमी अंतरावर कोकण दालन नावाचे एक ठिकाण आहे. कोकण पिरसराचा ५०० वर्षांचा सांस्कृतिक इतिहास लाकडाच्या मानवी पुतळ्यांमधून या ठिकाणी साकारण्यात आला आहे. कोकणची प्राचीन समाजरचना, जुनी वेशभूषा, केशभूषा, बारा बलुतेदार, जुनी अवजारे, जुनी उपकरणे व हत्यारे. त्या पुतळयांना व वस्तुना बघुन इतिहास जिवंत झाल्याचा भास होतो. हिरव्यागर्द टेकडीवर साधारण ३एकराच्या जागेत एक टुमदार कोकणी गांव वसलेलं आहे. गाईडच्या सहाय्याने आपल्याला प्राचीन कोकणातील सण-उत्सव-परंपरांचा प्रवास इथे अनुभवता येतो. या ठिकाणी लाकडी वस्तु विकत घ्यायच्या असतील तर अतिशय रास्त दरात आपण ते विकत घेऊ शकतो.

**मग लॉकडाऊन संपल्यानंतर चलायचं ना... तोपर्यंत आपली व आपल्या कुटुंबाची काळजी घ्या.**

# ❖ माय-मराठी ❖

## ☼ अवयवांचा उल्लेख असलेल्या म्हणी ☼

१) आपलेच दात आपलेच ओठ : आपल्याच माणसाविरुध्द बोलणे कठिण जाते.

२) ओठात एक आणि पोटात एक : बोलण्यात व कृतीत फरक असणे.

३) अंथरुण पाहून पाय पसरावे : ऐपतीच्या मानाने वागावे.

४) आधी पोटोबा, नंतर विठोबा : आधी स्वार्थ नंतर परमार्थ

५) अंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन डोळे : अपेक्षेपेक्षा जास्त मिळणे.

## ☼ प्राण्यांचा उल्लेख असलेल्या म्हणी ☼

१) अति शहाणा, त्याचा बैल रिकामा :

२) अगं अगं म्हशी, मला कुठे नेशी ? :

३) अडला हरी, गाढवाचे पाय धरी :

४) आंधळं दळतं आणि कुत्र पीठ खातं :

५) आयत्या बिळावर नागोबा :

६) कावळ्याच्या शापाने गाय मरत नसते:

वर दिलेल्या म्हणींचा अर्थ आपण पुढील अंकात बघुयात. जर आपणास या म्हणींचे अर्थ माहित असेल तर आपण 8390132085 या क्रमांकावर पाठवू शकता. योग्य उत्तर देणाऱ्या पहिल्या २० स्पर्धकांची नावे पुढील अंकात प्रकाशीत करण्यात येतील.

## ☼ समानार्थी शब्द ☼

१) आई = माता, जननी, माय

२) आकाश = आभाळ, नभ, अंबर, गगन

३) आनंद = हर्ष, मोद

४) आज्ञा = आदेश, हुकूम

५) अंधार = काळोख, तम

६) आदर = सन्मान, पूज्यभाव

## ☼ विरुध्दार्थी शब्द ☼

१) अनाथ X सनातन

२) अनुकूल X प्रतिकूल

३) अवजड X हलके

४) अर्थपूर्ण X निरर्थक

५) अनुरुप X विजोड

६) आकाश X पाताळ

संकलन : सौ.सुवर्णा सोळुंके
(उपमुख्याध्यापिका, छत्रपती पब्लीक स्कुल, केदारखेडा)

हसत-खेळत शिक्षण ❖ English View ❖

## ☼ Sound Of Letters अक्षरांचा आवाज ☼

| | | |
|---|---|---|
| 01) | A चा आवाज अॅ | Apple |
| 02) | B चा आवाज ब | Bat |
| 03) | C चा आवाज क | Cat |
| 04) | D चा आवाज ड | Dog |
| 05) | E चा आवाज ए | Egg |
| 06) | F चा आवाज फ | Fan |
| 07) | G चा आवाज ग | Grapes |
| 08) | H चा आवाज ह | Hen |
| 09) | I चा आवाज इ | Ink |
| 10) | J चा आवाज ज | Joker |
| 11) | K चा आवाज क | Kite |
| 12) | L चा आवाज ल | Lamp |
| 13) | M चा आवाज म | Man |
| 14) | N चा आवाज न | Net |
| 15) | O चा आवाज ऑ | Orange |
| 16) | P चा आवाज प | Parrot |
| 17) | Q चा आवाज क्व | Queen |
| 18) | R चा आवाज र | Rat |
| 19) | S चा आवाज स | Sun |
| 20) | T चा आवाज ट | Tiger |
| 21) | U चा आवाज अ | Umbrella |
| 22) | V चा आवाज व /व्ह | Van |
| 23) | W चा आवाज व | Wall |
| 24) | X चा आवाज एक्स | X-Ray |
| 25) | Y चा आवाज य | Yak |
| 26) | Z चा आवाज झ | Zip |

## ☼ For Practice ☼ Choose the right sound (योग्य आवाज निवडा)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) K : | ख | घ | ग | छ |
| 2) F : | भ | फ | प | म |
| 3) B : | ब | भ | म | प |
| 4) J : | ग | झ | ज | न |
| 5) T : | ख | घ | ग | छ |
| 6) A : | औ | अं | अॅ | ओ |
| 7) S : | श्र | स | ष | श |
| 8) H : | ह | अ | हॅं | ऋ |
| 9) M : | म्ह | भ | न | म |
| 10) D : | ढ | ट | ठ | ड |



संकलन : हर्षल सुर्यवंशी, (पारोळा, जि.जळगांव)

# ❖ चौकटीतले गणित ❖

## ☼ संख्या ☼




➢ नैसर्गिक संख्या :

- 1,2,3,4,... या संख्यांना नैसर्गिक संख्या म्हणतात.
- सर्वात लहान नैसर्गिक संख्या 1 आहे.
- नैसर्गिक संख्यांना मोजसंख्या असेही म्हणतात.

➢ पुर्ण संख्या :

- 0,1,2,3,4,... या संख्यांना पुर्ण संख्या म्हणतात.
- सर्वात लहान पुर्ण संख्या 0 आहे.
- सर्वात मोठी पुर्ण संख्या सांगता येत नाही.

➢ पुर्णांक संख्या :

- धन संख्या, ऋण संख्या व शुन्य या संख्यांना पूर्णांक संख्या म्हणतात.
- उदा. ............, -3, -2, -1, 0, 1, 2, 3, ........
- 0 हा मध्यवर्ती बिंदू आहे.
- सर्वात मोठी ऋणपुर्णांक संख्या -1 आहे.
- सर्वात लहान किंवा सर्वात मोठी पुर्णांक संख्या सांगता येत नाही.

क्रमशः

## सराव


खालील प्रश्न चुक की बरोबर ते ओळखा.

1) 1,2,3,... या संख्यां पुर्ण संख्या म्हणतात.
2) -5 ही संख्या नैसर्गिक संख्येच्या प्रकारात येते.
3) धन संख्या, ऋण संख्या व शुन्य या संख्यांना पुर्ण संख्या म्हणतात.
4) सर्वात लहान नैसर्गिक संख्या 0 आहे.
5) सर्वात लहान पुर्ण संख्या 0 आहे.

संकलन : कु.दया पवार मॅडम
(सहशिक्षीका, छत्रपती पब्लीक स्कुल, केदारखेडा)

## ओळख तज्ज्ञांची

# ❖ महान गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन ❖



जन्म : २२ डिसेंबर १८८७, मृत्यू : २६ एप्रिल १९२०

या महान गणित तज्ञाचा जन्म २२ डिसेंबर १८८७ रोजी तामिळनाडू येथील तंजावर तिरोड या गावी झाला. वयाच्या सातव्या वर्षापर्यंतच त्यांनी अभ्यासात एवढी प्रगती केली होती की त्यांना माध्यमिक शाळेत दाखल करण्यात आले होते. त्यांच्या असामान्य बुध्दिमत्तेमुळे माध्यमिक शाळेत असतांनाच ते अनेक प्रमेये आणि गणितीय सिध्दांत सांगत. त्यांचे ज्ञान बघुन शिक्षक सुध्दा चकित होत.

रामानुजन यांचा पहिला शोधनिबंधपर लेख इंडियन मॅथेमॅटिकल सोसायटीच्या नियतकालीकात १९११ मध्ये छापून आला. त्यावेळी त्यांची वय फक्त तेवीस वर्षांचे होते. या लेखामुळे जगाला त्यांच्या संशोधनाविषयी माहिती झाली. केंब्रिज ट्रिनिटी कॉलेजचे हे नामवंत गणिततज्ञ प्रो.हार्डी यांना रामानुजनने पत्र लिहिले. रामानुजन यांचे पत्र वाचताच हे गणिताचे गाढे अभ्यसाक आणि थोर गणिततज्ञ आहेत असे मत प्रो.हार्डी यांनी व्यक्त केले होते.

१९१४ ते १९१७ या तिन वर्षांमध्येच रामानुजन यांनी ३२ संशोधनपर लेख लिहिले. १९१८ साली रॉयल सोसायटीने त्यांना आपले सदस्यत्व बहाल केले. त्यावेळी ते केवळ तीस वर्षांचे होते. त्यानंतर त्यांना केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजची फेलोशिप मिळाली. ही फेलोशिप मिळविणारे ते पहिले भारतीय होत.


२९ एप्रिल १९२० रोजी वयाच्या अवघ्या तेहेतीसाव्या वर्षी हे महान गणितज्ञ हे जग सोडून गेले. अशा या महान गणितज्ञाचा जन्मदिवस आपण राष्ट्रीय गणित दिवस म्हणून साजरा करतो.

संकलन : कु.दया पवार मॅडम

(सहशिक्षीका, छत्रपती पब्लीक स्कुल, केदारखेडा)

टिप : विशेष व तज्ञ व्यक्तींची माहिती 8390132085 या क्रमांकावर व्हाट्सअप द्वारे पाठवू शकता.


# ज्ञान-विज्ञान




## ☼ मिळवा प्रयोगातून ज्ञान ☼

आपण आपल्या गॅलरीत, टेरेसवर किंवा अंगणात फुलझाडांच्या कुंड्या ठेवतो. त्याला दररोज न चुकता पाणी घालतो. पण कधी-कधी झाडांना पाणी द्यायला आपण विसरतो सुध्दा किंवा आठवड्याभरासाठी बाहेरगावी जायचे असेल तर त्या फुलझाडांचे कसे होईल ? आपण परत येईपर्यंत ही फुलझाडे कोमेजून जातील किंवा नष्ट होतील. फिरायला तर जायचे आहे मग काय करणार ? चला तर मग यासाठी खालील प्रयोग करुन बघुया...

**साहित्य : एक प्लास्टीकची बरणी किंवा भांडे, सुतळीचे तुकडे, स्टुल, झाडांच्या कुंड्या इ.**




कृती : १. एक प्लास्टीकचे बरणी घ्या. २. आपण लावलेल्या झाडांच्या संख्येनुसार त्या बरणीला छिद्रे पाडा. ३. त्या छिद्रांतून सुतळी ओवून घ्या व बरणी कुंड्यांपासून उंचावर ठेवा. ४. सुतळीचे एक टोक बरणीमध्ये ठेवा व दुसरे टोक झाडांच्या कुंड्यांमधील थोडी माती उकरुन त्यात ठेवा. ५. आता प्लास्टीकच्या बरणीमध्ये पाणी टाका. ६. थोडा वेळ निरीक्षण केल्यानंतर आपल्याला कोरड्या असलेल्या सुतळया ओल्या होत असल्याचे लक्षात येईल. थेंब-थेंब पाणी झाडाच्या बुडाकडे जाता असतांना दिसेल.

या मागील शास्त्रीय कारण : केशतंतुमध्ये आकर्षण शक्ती असते.

**स्त्रोत : श्रीमती सुमित्रा जाधव यांच्या 'मिळवा प्रयोगातून ज्ञान' या पुस्तकातून साभार**

टिप : कमी खर्चामध्ये करण्यासारख्या प्रयोगांची माहिती आपण 8390132085 या क्रमांकावर व्हाट्सअप द्वारे पाठवू शकता.

ज्ञान-तंत्रज्ञान

# ❖ Info-Tech ❖

## ☼ संगणक जिज्ञासा ☼



### Computer Shortcut keys (MS-WORD)

#### Basic Shortcut keys (Ctrl+...)

**Ctrl + A = Select all**

**Ctrl + B = Bold**

**Ctrl + C = Copy**

**Ctrl + D = Font**

**Ctrl + E = Center Alignment**

**Ctrl + F = Find**

**Ctrl + G = GoTo..**

**Ctrl + H = Replace**

**Ctrl + I = Italic**

**Ctrl + J = Justify Alignment**

**Ctrl + K = Hyperlink**

**Ctrl + L = Left Alignment**

**Ctrl + M = Indent Paragraph from Left**

**Ctrl + N = New Document**

**Ctrl + O = Open**

**Ctrl + P = Print**

**Ctrl + Q = Remove Paragraph Formatting**

**Ctrl + R = Right Alignment**

**Ctrl + S = Save**

**Ctrl+T = Set the Hanging Indent (Ruler bar)**

**Ctrl + U = Underline**

**Ctrl + V = Paste**

**Ctrl + W = Close the Active Window**

**Ctrl + X = Cut**

**Ctrl + Y = Redo/Repeat**

**Ctrl + Z = Undo**

---

## ☼ शैक्षणिक App... ☼

**DIKSHA App :** या ॲप मध्ये पुर्ण वर्गाचा अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात आलेला असून. हे मोफत वापरता येणारे ॲप आहे.

**परिपाठ App :** एक आदर्श परिपाठा घेण्यासाठी हे एप खुपच उपयुक्त आहे.

संकलन : चेतन चव्हाण,
(संगणक शिक्षक, वडोद तांगडा)

## स्पर्धा परिक्षा तंत्र

## ❖ तयारी स्पर्धा परिक्षेची ❖

१) जगातील सर्वात मोठा देश कोणता ?

२) जगातील सर्वात लांब नदी कोणती ?

३) जगातील सर्वात मोठे वाळवंट कोणते ?

४) जगातील सर्वात लांब धरण कोणते ?

५) जगातील सर्वात उंच शिखर कोणते ?

६) जगातील सर्वात मोठी मशिद कोणती ?

७) जगातील सर्वात मोठा खंड कोणता ?

८) जगातील सर्वात लहान खंड कोणते ?

९) जगातील सर्वात मोठा धबधबा कोणता ?

१०)जगातील सर्वात मोठी राज्यघटना कोणती

अशा प्रकारच्या विविध प्रश्नांसाठी व अधीकच्या माहितीसाठी

http://shankarchaure.blogspot.in ब्लॉगला भेट द्या.

संकलक :- शंकर सिताराम चौरे, धुळे (प्रा.शिक्षक) 9422736775

--------------

## समूहदर्शक शब्द ओळखा

1) गुरांचा कळप, तसा विमानांचा_____

2) फुलांचा गुच्छ, तसा फुलझाडांचा_____

3) करवंदाची जाळी, तशी काजूंची____

4) पोत्यांची थप्पी,तशी धान्याची_____

5) टोळी - चोरांची,तशी मोळी_____

6) फुलांचा गुच्छ, तसा वेलींचा_____

7) भाकरीची चवड,तशी मडक्यांची____

8) बेट कशाचे ?_____

9) वारूळात समूहाने राहणारा प्राणी कोणता ?

10) पक्ष्यांच्या समूहाला काय म्हणतात ?

संकलक :- श्री.नवनाथ सुर्यवंशी, अहमदनगर (8308207882, 7020274294)



**या सदरातील उत्तरे शेवटच्या पानावर.**

आपल्याकडे स्पर्धपरिक्षेची तयारी करण्यासाठी उपयुक्त माहिती असेल तर तर ८३९०१३२०८५ या क्रमांकावर व्हाट्सअप च्या माध्यमातून नक्की पाठवा. सोबत आपले पुर्ण नाव, पत्ता व एक फोटो पाठवायला विसरु नका. आपण पाठविलेली माहिती आपल्या नावासह प्रकाशीत करण्याचा आम्ही नक्कीच प्रयत्न करु.

# आजीच्या गोष्टी



## ❖ खरा भक्त कोण ? ❖

एकदा नारदमुनींनी विष्णुदेवास विचारले, 'परमेश्वरा, तुमचा प्रिय भक्त कोण आहे ?' नारदमुनींना अपेक्षा होती की ते त्यांचे नाव घेतील. कारण ते प्रत्येक क्षणी 'नारायण' या शब्दाची जपमाळ करत असत. तेव्हा भगवान विष्णू म्हणाले, 'पृथ्वीवर राहणारा सखाराम नावाचा शेतकरी माझा प्रिय भक्त आहे.' सखाराम याचे नाव ऐकून नारदमुनी लगेच पृथ्वीवर पोहोचले. त्यांनी पाहिले, सखाराम सकाळी एकदाच देवाचे नाव घेतो आणि मग बैलं घेऊन शेतात निघून जातो. तेथे तो दिवसभर शेतात राब-राब राबतो, कष्ट करतो आणि संध्याकाळी घरी येतो. जेवण केल्यावर रात्री झोपेच्या आधी पुन्हा एकदा देवाचे नाव घेतो. नारदमुनी लगेच विष्णुलोकात पोहोचले व म्हणाले, 'भगवंत, सखाराम दिवसातून फक्त दोन वेळाच



तुमचे नाव घेतो तरी तो तुम्हाला प्रिय कसा ?' भगवान विष्णू म्हणाले, 'मी तुमच्या प्रश्नाचे उत्तर देईन, परंतू प्रथम तुम्ही हे भांडे पाण्याने भरून आणा आणि ते घेऊन पृथ्वीभोवती प्रदक्षिणा करुन या. मात्र एक गोष्ट लक्षात ठेवा, या भांड्यातून एकही पाण्याचा थेंब खाली पडता कामा नये.' नारदमुनी संपूर्ण मार्ग स्थिरपणे चालत राहिले आणि पाण्याचा एकही थेंब खाली पडू दिला नाही. जेव्हा ते परत आले तेव्हा भगवान विष्णूंनी विचारले, 'तुम्ही वाटेत माझे नाव किती वेळा घेतले ?' नारद म्हणाले, 'आपण माझ्यावर असे काम सोपवले होते की, माझे सगळे लक्ष त्याकडेच होते. मग आपले नाव कसे घेणार ?' ' मी सुध्दा सखारामला काम दिले आहे. तो जरी माझे नाव सतत घेत नसला तरी माझे नाव घेऊन तो कामाला सुरुवात करतो. आपल्या कामात मनापासून रमतो. जो व्यक्ती त्याचे काम मनापासून आणि व्यवस्थित करतो तिच खरी भक्ती.'

तात्पर्य : फक्त देव-देव करणे याला भक्ती म्हणता येत नाही. जो आपले काम मनापासून करतो तोच खरा भक्त. तिच खरी देवाची भक्ती असते.

संकलन : सौ.वर्षा गव्हाणे मॅडम

(सहशिक्षीका, छत्रपती पब्लीक स्कुल, केदारखेडा)

**आपल्या कडे सुध्दा छान-छान गोष्टी असतील तर 8390132085 या क्रमांवर नक्की पाठवा. सोबत आपले पुर्ण नाव, पत्ता पाठवायला विसरु नका.**

# KiD'S CORNER



## बोलके चित्र




पियुष भिमराव रायते, वर्ग ४था,
कै.भाऊसाहेब देशमुख विद्यालय, भोकरदन




व्योमकेश चंद्रशेखर देशमुख, वर्ग ३रा,
पायोनियर सीबीएससी इंटरनॅशनल स्कूल, भोकरदन




अर्पिता गजानन पडोळ, के.जी.2,

छत्रपती पब्लीक स्कुल, केदारखेडा ता.भोकरदन



वेदिका सुरेश भोसले, वर्ग ४था,

मराठवाडा रेडेएंट स्कुल, भोकरदन








आदर्श चंद्रशेखर देशमुख, वर्ग ७वा,
न्यू हायस्कूल, भोकरदन



अर्णव प्रल्हाद काळे, वर्ग १ला,
मोरेश्वर इंग्लिश स्कुल, राजूर ग. ता.भोकरदन




वेदांत सचिन गायकवाड, वर्ग ८वा, संस्कार बालक मंदिर, औरंगाबाद







## ❖ कोडे सोडवा ❖

प्रश्न क्र.1 :




प्रश्न क्र.2 :




प्रश्न क्र.3 : 1 रुपयाला 3 चॉकलेट मिळतात. 3 चॉकलेटचे कव्हर परत केल्यावर अजून 1 चॉकलेट मिळते तर 45 रुपयात एकुण किती चॉकलेट येतील ?

प्रश्न क्र.4 : भाकरींची संख्या 20 व भोजन करणाऱ्या व्यक्तीसुध्दा 20 आल्या पाहिजे.(पुरुष,स्त्रीया व मुले सर्वांचा सहभाग आला पाहिजे.) प्रमाण पुढीलप्रमाणे:

एक पुरुष 3 भाकरी खातो. एक स्त्री 2 भाकरी खाते व एक मुलगा 1/2 (अर्धी) भाकर खातो.

एकूण 20 भाकरी आहेत, आणि वरिल सर्व व्यक्ती पण 20 आहेत. तर सांगा पुरुष किती ?, स्त्रीया किती ? आणि मुले किती ?

---

**शाळेचे मॅनेजमेंट सॉफ्टवेअर, वेबसाईट तयार करण्यासाठी संपर्क :**

श्री.चेतन चव्हाण, मो.नं. 9764462519

chetanchavhan100@gmail.com www.abhyudaysofttech.com




# ☺ चला हसुया ... ☺



## सुरी आहे का ?


बंटी : आई, आपल्याकडे कांदे सोलायला सुरी आहे ना ?

आई : हो आहे की ! का रे ?

बंटी : आजी मला सांगत होती. तुझ्या आईला नाकाने कांदे सोलायची सवय आहे म्हणुन...! ☺ ☺

---

## आहे का उत्तर ?



(बंटी एका कुत्र्याला त्रास देत होता. ते पाहून शेजारचे काका म्हणाले...)

काका : हे बघ बंटी, आता जर तू या कुत्र्याचे कान ओढलेस तर मी तुझे कान ओढीन ! काय समजलं का ?

बंटी : हो समजलं, समजलं ! इथूनपुढे त्याचा कान नाही ओढणार. आता त्याची शेपूट ओढणार मग तर झालं... ? ☺ ☺

---

## ।। एक सुचना ।।

संदर्भ व स्त्रोत : मासिकामध्ये वापरण्यात आलेले प्रासंगिक चित्रे Google Image वरुन घेण्यात आलेले आहेत. तसेच मासिकातील काही माहितीचा संदर्भ Google, Wikipedia वरुन घेण्यात आलेला आहे.

**मासिकातील लेख, कविता किंवा इतर माहितीवर आक्षेप असल्यास 8390132085 या क्रमांकावर संपादकांशी संपर्क साधावा.**

# माझी शाळा-माझे उपक्रम

# ❖ छत्रपती पब्लीक स्कुल, केदारखेडा ❖




शाळेतील आधुनिक सुविधा पाहून भारावून
भास्कर दानवे : छत्रपती पब्लिक स्कूलला सदिच्छा
जालना नगरी
Friday 2019/08/02
छत्रपती पब्लिक स्कूल केदारखेडा येथे अण्णाभाऊ साठे जयंती व टिळक पुण्यतिथी साजरी
पब्लिक स्कूल येथे आ
सकाळ
लोकमत
छत्रपती पब्लिक स्कूलमध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या निमित्त अभिवादन करताना मुख्याध्यापक गणेश सोळुंके, काकासाहेब मुरकुटे आदी.
वृक्षारोपण ... केदारखेडा येथील छत्रपती पब्लिक स्कूल येथे यवसांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी डॉ. नारायण मिरकर, योगेश बोर्डे, डॉ. मनीषा योगेश बोर्डे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.


स्नेह सम्मेलन में छात्रों ने कराया भारतीय संस्कृति का दर्शन
स्नेहसंमेलनात संस्कृतीचे दर्शन
छत्रपती पब्लिक स्कूलमध्ये घे भरारी स्नेहसंमेलन उत्साहात
समाजापुढे आदर्श निर्माण करणारे स्नेहसंमेलन
निर्मला दानवे यांचे मत } छत्रपती पब्लिक स्कूलच्या कलाविष्काराने रसिक मंत्रमुग्ध
शाळेचा नावलौकिक वाढवा!
सौ. दानवे : छत्रपती स्कूलचे स्नेहसंमेलन
स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांचा कलाविष्कार
स्नेहसंमेलनात चिमुकल्यांच्या कालाविष्काराने रसिक मंत्रमुग्ध



[माझ्या शाळेचे व्हिडीओ बघण्यासाठी येथे क्लिक करा :](#) **क्लिक करा**

[माझ्या शाळेबद्दल आपल्या प्रतिक्रीया देण्यासाठी येथे क्लिक करा.](#) **क्लिक करा**

[माझ्या शाळेच्या ब्लॉगला भेट देण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा :](#) **क्लिक करा**

**आपल्या शाळेत राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती, फोटो, युट्यूब लिंक किंवा ब्लॉग आमच्यासोबत शेअर करण्यासाठी 8390132085 या क्रमांकावर पाठवा.**

## ❖ सदरातील उत्तरे येथे बघा ❖

### स्पर्धा परिक्षेची तयारी...

#### ☼ सामान्य ज्ञान स्पर्धा परिक्षा तंत्र ☼

उत्तर : 1) रशिया, 2) नाईल, 3) सहारा वाळवंट, 4) हिराकूड 5) माउंट एव्हरेस्ट, 6) जामा मशिद, 7) आशिया, 8) ऑस्ट्रेलीया, 9) एंजल धबधबा, 10) भारताची

#### ☼ समूहदर्शक शब्द ओळखा ☼

उत्तर : 1) ताफा, 2) ताटवा 3) गाथण 4) रास 5) ऊसाची 6) कुंज 7) उतरंड 8) बांबुचे 9) मुंग्या 10) थवा

### बालविश्व मधील उत्तरे :

**प्रश्न क्र.1चे उत्तर : 36**

**प्रश्न क्र.2चे उत्तर : 26**

**प्रश्न क्र.3चे उत्तर : 45चे 135 चॉकलेट येतील . 135 कव्हर वापस केल्यावर 45 चॉकलेट मिळतील. 45 चॉकलेट चे कव्हर वापस केल्यावर 15 चॉकलेट मिळतील . पुन्हा 15 चॉकलेट चे कव्हर वापस केल्यावर 5 चॉकलेट मिळतील. पाच मधील तीन कव्हर वापस केल्यावर 1 चॉकलेट मिळेल. आता या एकाचॉकलेट चे कव्हर आणि मागील दोन चॉकलेट चे कव्हर म्हणजेच तीन कव्हर वापस केल्यावर 1 चॉकलेट मिळेल .**

**म्हनजेच. 135+45+15+5+1+1=202**

**प्रश्न क्र.4चे उत्तर : 1 पुरुष = 3भाकरी, 5 स्त्रीया = 10 भाकरी; 14 मुले = 7 भाकरी**

-------------------------------------

या ई-मासिकातील माहितीशी संपादक व इतर सहकारी सहमत असतीलच असे नाही. हि माहिती वेगवेगळ्या माध्यामातून संकलित केलेली असून त्यांना एकत्रित आणून सदरील मासिक प्रसिध्द केलेले आहे. या मासिकातील काणत्याही घटकाबद्दल सुचना, तक्रारी असतील तर 8390132085 क्रमांकावर संपर्क साधावा.

**या साप्ताहिकातील प्रत्येक लेख व घटक हा लेखकांकडे व संपादकांकडे सुरक्षीत असून या मासिकाचे किंवा त्यातील कोणत्याही भागाचे पुनर्मुद्रण करण्यासाठी संपादकांची व लेखकांची परवाणगी घेणे आवश्यक आहे. अन्यथा कायदेशी कारवाई होऊ शकते.**

**संदर्भ व स्त्रोत : मासिकामध्ये वापरण्यात आलेले प्रासंगिक चित्रे Google वरुन घेण्यात आलेले आहेत. तसेच मासिकातील काही माहितीचा संदर्भ Google, Wikipedia वरुन घेण्यात आलेला आहे.**

डिजिटल ई-मासिक
ज्ञान-मंथन

# धन्यवाद...!

## आपल्याला हे ई-बुक कसे वाटले नक्की कळवा.


**आपला : गणेश एन.सोळुंके**

**Mob.No. – 8390132085**

**E-mail Id – gnsolunke0092@gmail.com**


डिजिटल ई-मासिक

ज्ञान-मंथन